**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2019: 6.251, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, OCT-NOV, 2020, VOL- 8/42*

# कुटुंबजीवन शिक्षण व एडस् जाणीव संबंधी माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आधारित साधन निर्मिती

**संजय बबन देवकर, Ph. D.**

*सौ. निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय भोर, ता. भोर जि. पुणे*

Scholarly Research Journal's *is licensed Based on a work at* www.srjis.com

## १.० प्रस्तावना

### १.१ कुमारावस्थेतील शारीरिक बदल व त्यांचे परिणाम -

२४ वर्षाखालील वयोगटातील विद्यार्थीच ख-या अर्थानी एडस्ची बळी ठरणारी पायाभूत लोकसंख्या आहे. नव्हें - नव्हें तर यांच्याच खांदयावर भावी संपन्न विकसित देशाचे स्वप्न आधारभूत आहे. या विद्यार्थ्यांना शास्त्रीय वस्तूनिष्ठ माहिती लैंगिक शिक्षणाबाबत देऊन जबाबदार लैंगिक वर्तनाची जाणीव निर्माण करणे गरजेचे आहे.[३]

वय वर्ष १३ ते १९ हा कालखंड म्हणजेच ‘वादळ व तणावाची अवस्था’. या वयात अनेक शारीरिक बदल होतात. त्याचे पडसाद अनेक इतर जसे मानसिक, भावनिक, सामाजिक इत्यादी पैलूंवर त्यांचा परिणाम होतो. वयात येताना मेंदूतील ग्रंथी ॲन्टीरियर पिट्युटरी ग्रंथी कार्यान्वित होते. त्यातून इस्ट्रोजन हा स्त्राव तयार होतो या इस्ट्रोजनमुळे मुलींमध्ये व मुलांमध्ये टेस्टेस्टोरॅन या संप्रेकामुळे शारीरिक बदल होतात. या स्त्रावामुळे मुले व मुलींमध्ये अनेक होणा-या शारीरिक बदलाचा परिणाम त्यांच्या एकूणच वर्तनावर देखील होतो.

त्यामुळे अशा या टार्गेट गुपला कुटुंबजीवनन शिक्षण व एडस् यावद्दलची माहिती शास्त्रशुद्ध उपलब्ध करून दयावी असे संशोधकाला वाटते.

### १.१.१.३ सेवाधाम ट्रस्ट सर्वेक्षण अहवाल निष्कर्ष -

पुण्यातील सेवाधाम ट्रस्ट या ‘एडस्’ संबंधी कार्य करणा-या सामाजिक संस्थेच्या सर्व्हेनुसार देहविक्री करणा-या स्त्रीयांची जेव्हा मुलाखत घेतली तेव्हा भयान सत्य सर्वासमोर आले. त्यांच्या देहविक्री व्यवसायाात मंदी ही इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षेच्या काळात असते तर व्यवसायात तेजी ही इयत्ता १० वी

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

व इयत्ता १२ वी च्या परीक्षेनंतर अधिक असते. त्यामुळे या वयातील म्हाणजेच १५ ते १८ वयोगाटातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. शास्त्रीय माहिती पुरविणे आवश्यक आहे. एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के लोकसंख्या कौमार्यावस्थेतील आहे तर त्यातील ७५ टक्के लोकसंख्या ही एडस्ग्रस्त आहे. एकूणच कुटुंबजीवनन शिक्षण व एडस् अंतर्गत कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये निकोप जबाबदार लैंगिक सवयी जडण्यासाठी संशोधक निर्मित बहुमाध्यमसंचाद्वारे उद्बोधनाचा अध्यापक शिक्षण पदवी स्तरावरील विद्यार्थी शिक्षकांची यासंबंधी जाणीव पाहण्याचा संकल्प संशोधकाने केला आहे.

**१.१.३ समस्या विधान -**

कुटुंबजीवनन शिक्षण व एडस् जाणीव संबंधी माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आधारित साधन निर्मित करणे.

शिक्षणशास्त्र पदवी स्तरावरील कुटुंबजीवनन शिक्षण व एडस्बाबत जाणीवेचा अभ्यास करून संप्रेषण तंत्रज्ञानावर आधारित साधनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

**१.१.४ कार्यात्मक व्याख्या -**

**१) एडस् -**

संपादित रोग प्रतिकारक शक्ती कमतरता निर्माण करणा-या लक्षणांचा समुह म्हणजे एडस्.[५]

**२) कुटुंबजीवनन शिक्षण -**

मुलामुलींचे प्रजनन स्वास्थ्य भविष्यातील जबाबदार माता व पिता याची जाणीव जबाबदार जोखिम विरहीत लैंगिक वर्तन लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम याबद्दलचे वास्तव व शास्त्रीय ज्ञान म्हणजेच कुटुंबजीवनन शिक्षण.[६]

**३) शिक्षणशास्त्र पदवी स्तरावरील विद्यार्थी -**

एनसीटीई व पुणे विद्यापीठ यांनी नेमून दिलेली सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम एक वर्ष कालावधी सहशिक्षण स्वरूपात अध्ययन करणारे सौ.निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय भोर येथील विद्यार्थी.

Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

**४) विद्यार्थ्यांची जाणीव -**

कुटुंबजीवनन शिक्षण व एडस् अंतर्गत विद्यार्थ्यांचे शास्त्रीय ज्ञान पातळी म्हणजेच विद्यार्थ्यांची जाणीव.

**५) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आधारीत साधन -** संगणकाच्या सहाय्याने संगणकावर उपलब्ध असणा-या मायक्रोसॉफ्टचा वापर व त्यासंबंधी अन्य तांत्रिक साहित्य अवलंब करून कुटुंबजीवन शिक्षण व एडस् या घटकांचे उद्बोधन करताना शिक्षणशास्त्र पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना परिणामकारक अनुभुती देण्यासाठी केलेली नियोजनपूर्वक अध्यापन व्यवस्था म्हणजेच माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आधारीत साधनाद्वारे उद्बोधन.

**६) परिणामकारकतेचा अभ्यास -**

माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आधारित शिक्षण पदवी स्तरावरील विद्यार्थी शिक्षकांना कुटुंबजीवन शिक्षण व एडस् संबंधी उद्बोधन पूर्व व उत्तरचाचणीद्वारे प्राप्त केलेल्या गुणांची मध्यमान स्तरावरील तुलना म्हणजेच परिणामकारकतेचा अभ्यास.

**१.१.५ अवस्था १. संकल्पित साधन -**

लैंगिक शिक्षण अंतर्गत लोकसंख्या शिक्षण एच.आय.व्ही., एडस्, गुप्तरोग, प्रजनन प्रक्रिया व कुटुंब जीवन शिक्षण याबाबत माहिती देणारी अनेक समुह संपर्क माध्यमे उपलब्ध आहेत. सर्वसाधारणपणे असे म्हटले जाते. 'When I hear, I forfet, when I see I remember but when I do I understand.' याच उक्तीप्रमाणे किमान श्रवणाची व दृश्य अनुभव देण्याची संधी विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण पद्धतीने उपलब्ध करून दिली तर नक्कीच लैंगिकच नव्हे तर अन्य प्रकारच्या शिक्षणाची उद्दिष्टे साध्य होतील. म्हणूनच संशोधकाने संकल्पित साधन अंतर्गत (संगणक सहाय्यित कार्यक्रम) एडस् प्रतिबंधन संदर्भात संगणक सहाय्यित साधन निर्माण करण्याचा विचार केला.

Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

**१.१.५.१ साधनाचे वेगळेपण -**

या साधन निर्मितीत वेगळेपण साधण्यासाठी संशोधकाने जाणीवपूर्वक खालील बाबींचा विचार केला आहे.

१) लैंगिक शिक्षण विषयांतर्गत असणा-या लोकसंख्या शिक्षण, प्रजनन प्रक्रिया, एच.आय.व्ही.व एडस्, कुटुंबजीवनन शिक्षण या विषायांबद्दल माहिती देणे.

२) संबंधित विषय संदर्भाची कॉम्पॅक्ट डिशक्रसीडीक्रपॉवर पॉइंट प्रेझेंटेशन कार्यक्रम तयार करणे.

३) संगणकातील आधुनिक तंत्रातील ॲनिमेशन इफेक्टचा वापर करणे.

४) रेडियो या समुह संपर्क माध्यमाच्या सहाय्याने सीडी मध्ये आवश्यक ती श्राव्य ध्वनी मुद्रित करणे.

५) संशोधकाच्या स्वत:च्या इ-मेल आयडी, ब्लॉग माध्यमाद्वारे संबंधित माहिती प्रसारासाठी सर्वांसाठी खुली करणे.

६) समाजातील अनेक घटकांची या विषया संदर्भात आवाहन मुद्रित करणे. उदा. डॉक्टर, सिने - मालिका अभिनेते, अभिनेत्री इत्यादी.

वरील घटक विचारात घेता साधन 'सीडी' असले तरी आधुनिक अनेक तंत्रपद्धतीचा वापर करून त्यात वेगळेपण साधले गेले आहे. तसेच संबंधित सीडी केवळ संशोधनाचा भाग न राहता समाज उद्बोधन - प्रबोधनाचे अमोघ साधन ठरेल असा विश्वास संशोधकास वाटतो.

**१.१.५.२ टप्पा - २ साधनाची उद्दिष्टे**

१) कुटुंबजीवन शिक्षण व एडस् बाबतीत शास्त्रीय माहिती संकलन करणे

२) प्राप्त शास्त्रीय माहितीवर प्रक्रियेद्वारे सीडी स्वरूपात दृक-श्राव्य साधन निर्मिती करणे.


३) सौ.निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय भोर येथील प्रशिक्षणार्थींचे एडस् व कुटुंबजीवन शिक्षणबद्दलची जाणीव पूर्वचाचणीच्या आधारे पडताळून पाहणे.

४) कुटुंबजीवन शिक्षण व एडस् बाबतची जाणीव जागृती माहिती संप्रेषण तंत्रज्ञान सहाय्यित साधनाद्वारे उद्बोधन करणे.

Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

५) कुटुंबजीवन शिक्षण व एडस् बाबतची जाणीव उत्तरचाचणी आधारे तपासून पहाणे.

६) कुटुंबजीवन शिक्षण व एडस् जाणीवजागृती माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आधारीत साधनाची सार्थकता पूर्व व उत्तरचाचणीतील फरकाच्या आधारे तपासून पाहणे.




**१.१.७ परिकल्पना**

**संशोधन परिकल्पना -**

संशोधक निर्मित बहुमाध्यमसंचाद्वारे उद्‌बोधनामुळे बी.एड्.प्रशिक्षणार्थींच्या कुटुंबजीवन शिक्षण व एचआयव्ही एडस् जाणीवेतील गुणांच्या मध्यमानामध्ये पूर्वचाचणीच्या तुलनेत उत्तरचाचणीत सार्थ फरक असेल.

Ho **(शून्य परिकल्पना) -**

संशोधक निर्मित बहुमाध्यमसंचाद्वारे उद्‌बोधनामुळे बी.एड्.प्रशिक्षणार्थींच्या कुटुंबजीवन शिक्षण व एचआयव्ही एडस् जाणीवेतील गुणांच्या मध्यमानामध्ये पूर्व व उत्तरचाचणीत फरक असणार नाही.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**५.१.८ साधन निर्मितीच्या पाय-या -**




**आकृती क्र.५.१ साधन निर्मित पाय-या**

**१.१.११ संशोधन पद्धती -**

प्रस्तुत संशोधनात प्रायोगिक संशोधन पद्धती वापरली आहे. प्रस्तुत संशोधनात एड्स जागृती कार्यक्रम वापरून त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाला प्रयोग करून बघणे आवश्यक होते.

प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. ज्या योगे शिक्षणातील संप्रेषण अंतर्गत संशोधक निर्मित बी.एड् प्रशिक्षणार्थीच्या कुटूंबजीवन शिक्षण व एडस् संबंधी जाणिवेचा अभ्यास करणे शक्य झाले.

**१.१.१२ न्यादर्शनक्र जनसंख्या**

**१.१.१२.१ न्यादर्शन निवड -**

प्रस्तुत संशोधनासाठी शिक्षणशास्त्र पदवी स्तरावरील पुणे विद्यापीठ अंतर्गत एकूण १११ महाविद्यालये व १११०० शिक्षक प्रशिक्षणार्थी ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी शिक्षणशास्त्र पदवी स्तरावरील शिक्षक प्रशिक्षणार्थीची न्यादर्श निवड असंभावता पद्धतीतील प्रासंगिक पद्धतीने निवड करण्यात आली आहे.

| अ.नं. | महाविद्यालयाचे नाव | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | सौ.निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय भोर | ५० |
| | एकूण | **५०** |

प्रस्तुत संशोधनात असभाव्यता पद्धतीतील प्रासंगिक न्यादर्श पद्धतीचा वापर करून न्यादर्शनाची निवड केली आहे.

**१.१.१३ संशोधनातील चले -**

प्रस्तुत संशोधनातील चले खालील प्रमाणे आहेत.

१) स्वाश्रयी चल - संशोधक निर्मित कुटुंबजीवन शिक्षण व एड्स आधारित विद्यार्थी शिक्षकांचे दृक् - श्राव्य स्वरूप उदबोधन कार्यक्रम.

२) आश्रयी चल - विद्यार्थी शिक्षकांचे कुटुंबजीवन शिक्षण व एड्स संबंधी जाणीव जागृती.

**१.१.१४ माहितीचे विश्लेषण**

पूर्व व उत्तर कसोटीद्वारे प्राप्त माहितीचे विश्लेषण संख्यात्मक पद्धतीने केले. कसोटींची मध्यमाने काढली. मध्यमानातील फरकांची सार्थकता तपासली. त्यासाठी ''t' परिक्षिकेचा वापर केला.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

### १.१.१५ माहितीचे संकलन विश्लेषण व अर्थनिर्वचन

## Ho (शून्य परिकल्पना) -

संशोधक निर्मित बहुमाध्यमसंचाद्वारे उद्बोधनामुळे बी.एड्.प्रशिक्षणार्थींच्या कुटुंबजीवन शिक्षण व एचआयव्ही एडस् जाणीवेतील गुणांच्या मध्यमानामध्ये पूर्व व उत्तरचाचणीत फरक असणार नाही.

**सारणी क्र. ५.२ 't' मूल्य**

| चाचणी | r | df | M | D | SD | SE | SED | प्राप्त 't' मूल्य | सारणीतील नमुना 't' मुल्य □०.०५ स्तर□ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्वचाचणी<br>उत्तरचाचणी | **0.35** | **49** | **10.7**<br>**15.12** | **4.42** | **1.46**<br>**1.96** | **0.21**<br>**0.28** | **0.28** | **15.78** | **2.01** |

**निरीक्षण व अर्थनिर्वचन**

वरील सारणी क्रमांक ५.२ वरून असे दिसून येते की

प्राप्त t मूल्य 15.78 हे सरासरीतील t मूल्य 2.01 पेक्षा जास्त असल्याने संशोधन परिकल्पनेचा स्वीकार करून शुन्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

### १.२ निष्कर्ष

१) कुटुंबजीवन शिक्षण व एडस् संबंधी विविध वेबसाईटस् सम संपर्क माध्यमे, संदर्भ पुस्तके, विविध स्तरावरील संशोधने, मासिके, वृत्तपत्र या माध्यम स्तरावर माहिती उपलब्ध आहे. (संदर्भ प्रकरण क्रमांक दोन नुसार)

२) प्राप्त माहितीवर बहुमाध्यम संच दृष्टीकोनातून क्रिया-प्रक्रिया करून माहिती संप्रषण तंत्रज्ञानाद्वारे सीडी तयार करणे शक्य आहे.(संदर्भ प्रकरण तीन मधील ३.६ नुसार)

३) कुटुंबजीवन शिक्षण व एडस् संबंधी सौ.निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी ंची जाणीव पूर्वचाचणी स्तरावर १०.७ आहे. ( संदर्भ सारणी क्रमांक ५.४ नुसार)

४) कुटुंबजीवन शिक्षण व एडस् बाबत प्रशिक्षणार्थींचे बहुमाध्यम संचद्वारे एकलगट अभिकल्प स्तरावर करण्यात आले.( संदर्भ उद्बोधन नियोजन कोष्टक क्र.५.३ नुसार)

५) कुटुंबजीवन शिक्षण व एडस् संबंधी जाणीव पूर्व व उत्तर चाचणी आधारे पाहिली असता उत्तरचाचणीद्वारे प्राप्त मध्यमान पूर्वचाचणी मध्यमानाच्या ४.४२ स्तरावर अधिक फरक तुलनेने आहे. (संदर्भ सारणी क्र.५.४ नुसार)

६) कुटुंबजीवन शिक्षण व एडस् जाणीव जागृती माहिती संप्रेषण तंत्रज्ञान साधनाची सार्थकता पूर्व व उत्तरचाचणीतील प्राप्त गुणा आधारे 't' मूल्य ०.०५ स्तरापेक्षा अधिक म्हण्जोच २.०१ आहे. त्यामुळे प्रस्तुत साधनाची सार्थकता सिद्ध होते. (संदर्भ सारणी क्र.५.४ नुसार)

**संदर्भ ग्रंथ सूची**

*भातलवंडे प्र.वी. **"प्रश्न युवकांचे उत्तर आमचे."** राज्य एडस् कक्ष आरोग्य सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य २००१.*

*भातलवंडे प्र.वी. **"लैंगिक रोग निदान व उपचार."** अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा २००३.*

*भातलवंडे प्र.वी. गंगाखेडकर रमण **"यौवनाच्या उंबरठयावर"** युनिसेफ २००१.*

*जगताप ह.ना. **"प्रगत शैक्षणिक तंत्रज्ञान."** नूतन प्रकाशन १९९४*

*जोशी आनंद "एडस् भोवरा." राजहंश प्रकाशन १९९८*

*मुळे रा.शं. उमाठे वि.तु. (१९८७) **"शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे."** महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती साहित्य प्रसार केंद्र १९८७.*

*म्हस्के टी.ए. **"शैक्षणिक संख्याशास्त्र."** प्रज्ञा प्रकाशन संगमनेर १९९१*

*डॉ.साठे अनंत. डॉ.साठे शांता **"हे सारं मला माहित हवं ! किशोरावस्था ओलांडताना."** राजहंश प्रकाशन जानेवारी २००४.*

## English

*Buch, M.B., "Research in Edu. Survey – I V*

*International Encyclopedia of Aids.*

*Lets Talk about aids, WHO, New Delhi.*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*